**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**बुधवार दिनांक १९ फेब्रुवारी २०२५**

**ठळक बातम्या**

1. छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती सर्वत्र उत्साही वातावरणात साजरी; विदर्भातही विविध कार्यक्रमाचे आयोजन.
2. विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून आदिवासी विकास मंत्रालयाचे काम- आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांची नागपुरात माहिती.
3. नागपूर महामेट्रोच्या कंत्राटी कामगारांच्या केद्र सरकारने निर्धारित केल्याप्रमाणे किमान वेतन देण्याच्या कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या सूचना.
4. आमगाव देवरी विधानसभा क्षेत्राचे काँग्रेस पक्षाचे माजी आमदार सहसराम कोरोटे २१ फेब्रुवारीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेना गटात करणार प्रवेश.

-----------------------------

**छत्रपती जयंती**

छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती सर्वत्र उत्साहात साजरी होत आहे. यानिमित्त ठिकठिकाणी भव्य मिरवणुका, शोभायात्रा, व्याख्यानं, चित्र आणि शस्त्र प्रदर्शनं इत्यादी कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. मिरवणुका आणि पदयात्रांमधे शिवकाळ साकारणाऱ्या वेशभूषा तसंच कसरत करतब दाखवणाऱ्या कवायती लक्ष वेधून घेत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केलं आहे. शिवाजी महाराज यांच्या कार्यातून एक बलशाली, आत्मनिर्भर आणि समृद्ध भारत घडवण्यासाठी प्रेरणा मिळत असल्याची भावना त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशातून व्यक्त केली आहे.

*मेरे लिए छत्रपति शिवाजी महाराज ये सिर्फ नाम नहीं है, ये सिर्फ राजा महाराजा राज़ पुरुष मात्र नहीं है। हमारे लिए छत्रपति शिवाजी महाराज आराध्य देव है। हमारे लिये हमारे आराध्य देव से बड़ा कुछ नहीं हो सकता। छत्रपति शिवाजी महाराज की वीरता, विचारधारा और न्यायप्रियता ने कई कई पीढ़ियों*

*को प्रेरित किया। उनकी साहसिक कार्यशैली, सामरिक कौशल और शांतिपूर्ण राजनीतिक प्रणाली आज भी हमारे लिए प्रेरणा स्त्रोत है.*

**नवी दिल्लीतल्या लाल किल्ल्यावर शिवजयंतीनिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. ठिकठिकाणी जय शिवाजी - जय भारत पदयात्रेचं आयोजन करण्यात आलं असून त्यात युवावर्ग मोठ्या संख्येने सहभागी होत आहे. राज्यपाल सी. पी राधाकृष्णन यांनी मुंबईत शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पांजली अर्पण करुन अभिवादन केलं. शिवाजी महाराजांचं जन्मस्थळ किल्ले शिवनेरीवर शिवजन्मोत्सव उत्साहात साजरा झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यावेळी उपस्थित होते. पुण्यात केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविय तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत जय शिवाजी - जय भारत पदयात्रा काढण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज पराक्रमी राजा तसंच उत्कृष्ट शासक आणि व्यवस्थापन गुरु होते, असं फडणवीस यावेळी म्हणाले.त्यानंतर पुण्याजवळ आंबेगाव इथं उभारण्यात आलेल्या शिवसृष्टीच्या दुसऱ्या टप्प्याचं लोकार्पण या मान्यवरांच्या उपस्थितीत झालं. याप्रसंगी मुख्यमंत्र्यांनी शिवसृष्टी मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासाचे वर्णन करणाऱ्या तंत्रज्ञानाचा कौतुक केलं**

*मी जगाच्या पाठीवर अनेक देशांमध्ये गेलो. थ्रीडी पाहिल फोर डी पाहिल सेवेन डी पाहिला. फोरटीन डी पाहिल सिक्सटीन डी देखील बघितला पण जी प्रेरणा आणि जी भावना या थिएटरमध्ये तयार झाली या टाइम मशीनमध्ये तयार झाली ती अवर्णनीय आहे. मी तर असं म्हणेन की महाराष्ट्रातला आणि देशातला प्रत्येक आमचा विद्यार्थी या ठिकाणी आलाच पाहिजे. 36 मिनिटांमध्ये भारताचा इतिहास आणि त्या इतिहासामध्ये खऱ्या अर्थानं स्वराज्याच छत्रपतींच योगदान हे ज्या प्रकारे या ठिकाणी मांडण्यात आलेला आहे, हे अक्षरशः अवर्णनीय अशा प्रकारचं आहे.*

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री डॉ. मनसुख मांडवीया यांच्या प्रमुख उपस्थितीत 'जय शिवाजी जय भारत' पदयात्रेचा शुभारंभ पुणे इथं झाला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज यांचे १२ किल्ले लवकरचं जागतिक वारसा केंद्र होणार असल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. यासोबतच गडकिल्ल्यावरचे अतिक्रमण काढून या गडकिल्ल्याचे सौन्दर्य वाढवणार असल्याचं देखील त्यांनी सांगितलं.**

-----------------------------

**जय शिवाजी, जय भारत पदयात्रा**

**छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त केंद्र सरकारच्या दिशानिर्देशानुसार नागपूर महानगरपालिकेद्वारे आज सक्करदरा चौकात 'जय छत्रपती शिवाजी महाराज, जय भारत पदयात्रा'चे आयोजन करण्यात आले होते. भाजप प्रदेशाध्यक्ष तथा महसूल मंत्री आणि नागपुर जिल्ह्याचे पालकमंत्री चन्द्रशेखर बावनकुळे यांनी पदयात्रेला हिरवा झेंडी दाखविला. यावेळी बावनकुळे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केल. यावेळी मनपा आयुक्त, पोलीस आयुक्त यांचा सह अनेक वरिष्ठ अधिकारी, नागरीक या पदयात्रेत सहभागी झाले. सक्करदरा चौकातील राजे रघुजी भोसले स्मारक स्थळ इथून पदयात्रेचा शुभारंभ होऊन गांधी गेट महाल इथं छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याजवळ या पदयात्रेचं समापन कऱण्यात आहे. यावेळी युवक, युवतींनी विविध पारंपरिक कला सादर करीत छत्रपति शिवाजी महाराजांचा जयघोष केला. वर्धा जिल्ह्यात या पदयात्रेचा शुभारंभ वर्धेच्या सर्कस मैदान रामनगर इथून पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला. आकर्षक वेशभूषा, ढोल ताशांचा गजर, जय शिवाजी, जय भवानी च्या घोषणा आणि नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाने वर्धा नगरी दुमदुमली. अमरावतीच्या सायन्सकोर मैदान इथून निघालेल्या पदयात्रेत मल्लखांब, लेझीम, दांडपट्टा, योगा, शस्त्रकला आदींचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. पदयात्रेतील ही प्रात्यक्षिकं आणि देखावा नागरिकांचे आकर्षण ठरली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त वसंत देसाई क्रीडांगणापासून अकोला जिल्हाधिकारी कार्यालयात काढण्यात आलेल्या पदयात्रेत शेकडो अकोलेकर उत्स्फूर्तपणे सहभागी झाले.यवतमाळ मध्ये पदयात्रेचे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल इथं करण्यात आले होते. यात्रेच्या शुभारंभाप्रसंगी पालकमंत्री राठोड यांच्या हस्ते झाला. वाशिम इथं छत्रपती शिवाजी महाराज चौक इथं जिल्हा प्रशासनाच्यावतीनं छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांचा पाळणा सादर केला.**

-----------------------------

**आदिवासी मंत्री पत्रकार परिषद**

**आदिवासी विकास मंत्री डॉ.अशोक उईके यांनी नागपूर प्रेस क्लब येथे आज पत्रकारांशी संवाद साधला, पत्रकारांशी संवाद साधतांनी ते म्हणाले कि**

महाराष्ट्रातील जनजाती कुटुंबियांन करिता आदिवासी विभागद्वारे नव नवीन योजना राबविण्यात येत आहेत. याप्रसंगी उईके यांनी विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून आपले खाते काम करत असल्याचे सांगितलं

*शासकीय आदिवासी आश्रम शाळांमध्ये शिकणारे विद्यार्थी किंवा इतर ठिकाणी विद्यार्थी, विद्यार्थी हे केंद्रबिंदू समजून भविष्यामध्ये आमचे आदिवासी विभाग त्या दिशेने वाटचाल करेल. भविष्यामध्ये विद्यार्थी केंद्रबिंदू समजून आम्ही काम करण्याचा संकल्प केला असल्यामुळे नव नवीन उपयोजना कसे निर्माण करता येईलज्या जुन्या जुन्या योजना आहे. उदाहरणार्थ, 1983-84 या वर्षामध्ये आम्ही एखादा उद्योग लघु सुष्म उद्योग सुरू करण्यासाठी पाच हजार रुपये देत होतो. मुख्यमंत्री महोदयाने सांगितले. आता पाच हजारत काहीच होत नाही आता 50 हजारांपासून सुरु केले पाहिजे आहे. 50 ते 2 लाखपर्यंत जर जो उद्योगासाठी लघु सुष्म उद्योगासाठी निधी दिला तर तो उद्योग करेल अशा प्रकारचा आमचा संकल्प आहे.*

आदिवासी आश्रम शाळेमध्ये मुला मुलींची प्रवेश संख्या कसे वाढविता येईल त्या करिता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून एक दिवस मुक्काम शासकीय आदिवासी शाळेमध्ये अशा प्रकारचा प्रयोग सात फरवरीला 497 आदिवासी आश्रम शाळेमध्ये मुक्काम करून मुला मुलींशी चर्चा करून त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.असल्याचे ते या वेळी म्हणाले.

----------------------------

महामेट्रो आकाश फुंडकर

महामेट्रोच्या व्यवस्थापनाने मान्य केल्याप्रमाणे नागपूरमधील महामेट्रोच्या कंत्राटी कामगारांना केद्र सरकारने निर्धारित केल्याप्रमाणे किमान वेतन देऊन न्याय द्यावा, अशा सूचना कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी केल्या. महा मेट्रोअंतर्गत नागपूर मेट्रो रेल, नागपूर इथं कार्यरत असलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांबाबत कामगार मंत्री फुंडकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीस महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर उपस्थित होते. महामेट्रो मधील कंत्राटी कामगारांची केंद्रीय कामगार प्राधिकरणाकडे तसेच राज्य शासनाच्या कामगार विभागाकडे नोंदणी झालेली आहे. तथापि, महामेट्रोच्या कंत्राटी कामगारांचा वेतन प्रश्न हा न्यायालयीन असल्याने महामेट्रोच्या सर्व कंत्राटी कामगारांना शासनाने निर्धारित केल्याप्रमाणे किमान

वेतनानुसार वेतन देण्यासंदर्भात मेट्रो व्यवस्थापनाने कार्यवाही करण्याची सूचना कामगार मंत्री  फुंडकर यांनी केली.

-----------------------------

सहसराम कोरोटे

आमगाव देवरी विधानसभा क्षेत्राचे काँग्रेस पक्षाचे माजी आमदार सहसराम कोरोटे २१ फेब्रुवारीला उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेना गटात करणार प्रवेश करणार आहे . देवरी इथं हा प्रवेश सोहळा पार पडणार असल्याची माहिती माजी आमदार सहसराम कोरोटे यांनी पत्र परिषदेत दिली आहे. यावेळी त्यांच्या सोबत माजी आमदार मनोहर चंद्रिकापुरे, शिवसेना जिल्हा प्रमुख सुरेंद्र नायडू, मुकेश शिवहरे, युवा नेते डॉ सुगत चंद्रिकापुरे हे उपस्थित होते.

-----------------------------

नागार्जुन बुद्‌ध महोत्सव

अखिल भारतीय धम्मसेना, तसेच भिक्खू आणि भिक्खूनी संघाच्या संयुक्त वतीने बोधिसत्त्व नागार्जुन महाविहार, नागार्जुन टेकडी परिसर, रामटेक इथं, 26 फेब्रुवारी रोजी एकदिवसीय बोधिसत्त्व नागार्जुन बुद्‌ध महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती भदंत ससाई यांनी दिली.

-----------------------------

जलतरण स्पर्धा

महाराष्ट्र राज्य हौशी जलतरण संघटने द्‌वारा आयोजित ६१व्या राज्यस्तरीय सागरी जलतरण स्पर्धेत नागपूरचा सागर चापले याने पाचवे स्थान पटकाविले

मुंबई जवळील संक रॉक लाईट हाऊस ते गेट वे ऑफ इंडिया या खुल्या समुद्री जलतरण स्पर्धेते ५ किलोमीटर हे लांब पल्ल्याचे अंतर अवघ्या ४५ मिनिटात पूर्ण करीत यश संपादन केले.

-----------------------------

आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी क्रिकेट

नवव्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी क्रिकेट स्पर्धेलाआजपासून सुरुवात होत आहे. पाकिस्तान आणि दुबईत यास्पर्धेतले सामने होणार असून, आज पहिला सामना कराचीइथं पाकिस्तान आणि न्यूझीलंड संघादरम्यान होणार आहे. दुपारी अडीच वाजता सामन्याला सुरुवात होईल. रोहीत शर्माच्या नेतृत्वातल्या भारतीय संघाचा पहिला सामना उद्‌या दुबईत बांग्लादेशविरुद्‌ध होणार आहे.

-----------------------------